J76/76

2017-18 III


Volume 9 (Special Issue 07) Jan. 2018 ISSN-No.2230-9578

COSMOS IMPACT FACTOR 4.270

# Journal of Research and Development

UGC Approved Journal UGC No. 64768

A Multidisciplinary International Level Referred Journal



Editor - Dr. R. V. Bhole

Scanned by CamScanner

P. 56-60

# Journal of Research and Development

## A Multidisciplinary International Level Refereed Journal

COSMOS IMPACT FACTOR 4.270

UGC Journal list No. 64768

**Volume 9**

**Special Issue- 7, January 2018**

**ISSN-2230-9578**

Special Issue Editor

**Dr. Dnyaneshwar S. Suryawanshi**

**Principal VWS College, Dhule.**

**Editorial Board**

**Asst. Prof. Rajvirendrasing R. Gavit**
Head, Department of History
VWS College, Dhule

**Asst. Prof. Satish Jagannath Nikam**
Department of History
VWS College, Dhule

**Dr. Sunil C. Amrutkar**
Department of History
VWS College, Dhule

'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M. S.) 425102

Email-info@jrdrvb.com Visit-www.jrdrvb.com



Scanned by CamScanner

Journal of Research & Development
Vol.09 (Special Issue 07) Jan 2018,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

# अनुक्रमणिका


| अनु क्र. | नाव | शोध निबंधाचे शिर्षक | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रा. सौ. कविता सु. पाटील | ब्रिटिश सत्ताकाळातील घटनात्मक विकास | ७ |
| २ | प्रा. डॉ. मनिषा जगदाळे | ब्रिटिशांचे भारतातील शैक्षणिक धोरण - एक अभ्यास | १२ |
| ३ | डॉ. उत्तम पठारे | ब्रिटिश राजवट आणि तिचे भारतावरील परिणाम | १५ |
| ४ | डॉ. संतोष कदम | ब्रिटिश काळातील सातारा शहराचा झालेला शैक्षणिक विकास | २३ |
| ५ | डॉ. रघुनाथ चौधरी | ब्रिटिश सरकारने खान्देशातील शेती विकासासाठी केलेले प्रयत्न | २७ |
| ६ | डॉ. संजय बेंद्रे | ब्रिटिश राजवट आणि भारतीय समाज | ३१ |
| ७ | प्रा. मुरलीधर गायकवाड | भारतातील ब्रिटिश कालीन दारिद्र्याची समस्या | ३४ |
| ८ | डॉ. एस. एल. म्हात्रे | कापड उद्योग आणि महाराष्ट्रातील आर्थिक विकास | ३८ |
| ९ | प्रा. अनिल निकम | इंग्रजांचे वृत्तपत्रासंबंधीचे धोरण | ४१ |
| १० | प्रा. शांता गडगे | ब्रिटिश प्रशासन व आर्थिक राष्ट्रवादाचा उदय | ४३ |
| ११ | प्रा. नवनाथ वाजगे | ब्रिटिश राजवटीतील अहमदनगर व श्रीगोंदा येथील जलव्यवस्थापन | ४६ |
| १२ | डॉ. रघुराज कुरुमकर | ब्रिटिशांचे भारतातील आर्थिक - सामाजिक व सांस्कृतिक धोरण | ४९ |
| १३ | डॉ. विष्णू पडवाल | भारतीय स्वातंत्र्य लढ्यात महिलांचा सहभाग | ५३ |
| १४ | डॉ. प्रशांत देशमुख | हैदराबाद संस्थान : निजाम आणि ब्रिटिशांचे संबंध | ५६ |
| १५ | श्री. पोपट गायकवाड | ब्रिटिशांचे धोरण व आदिवासी समाज | ६१ |
| १६ | प्रा. डी. आर. कोळी | ब्रिटिश धोरणांचा भारतावरील आर्थिक प्रभाव | ६४ |
| १७ | सौ. सुनिता स. पाटील | ब्रिटिश राज्य व भारतीय शिक्षण | ७२ |
| १८ | डॉ. बाळकृष्ण पाटील | ब्रिटिशकालीन भारतीय शिक्षण व्यवस्था | ७५ |
| १९ | डॉ. संजय गवळी | ब्रिटिशकालीन महाराष्ट्रातील अंधश्रध्दा व प्रबोधन | ७८ |
| २० | डॉ. मंदा मोरे - थोरात | इंग्रज राजवटीतील भारतातील शिक्षण पध्दती : एक चिकित्सक अभ्यास | ८२ |
| २१ | डॉ. नानाजी भामरे | ब्रिटिश सत्तेचे भारतातील आर्थिक धोरण | ८६ |
| २२ | डॉ. पी. एस. सोनवणे | ब्रिटिश कायदे आणि भारतीय शिक्षण | ८९ |
| २३ | प्रा. यशवंत गावित | भारतातील इंग्रजी शिक्षणाचा प्रारंभ - एक दृष्टिक्षेप | ९९ |
| २४ | प्रा. सुनिल पाटील | ब्रिटिश आमदानीत भारतीय वृत्तपत्रांची भूमिका : विशेष संदर्भ लो. टिळक आणि केसरी | १०२ |
| २५ | डॉ. विवेकानंद चव्हाण | प्रबोधन काळातील मराठी वृत्तपत्रे व ब्रिटिश शासन | १०५ |
| २६ | प्रा. बी. आय. परदेशी | ब्रिटिशकालीन भारतीय कृषि क्षेत्रातील परिवर्तन | १०९ |
| २७ | डॉ. सुजाता गावयकवाड | ब्रिटिश कायद्यांचा, व्यवस्थेचा भारतातील विविध क्षेत्रावरील प्रभाव | ११४ |
| २८ | डॉ. सर्जेराव गोल्डे | ब्रिटिश कालीन शेती व भारतीय अर्थव्यवस्था | ११९ |
| २९ | डॉ. खासेराव शिंदे-पाटील | माऊंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यांचे पुणे रेसिडंट ते डेक्कन कमिशनर म्हणून केलेले प्रशासकीय कामकाज | १२३ |
| ३० | डॉ. भारती लाडकर | ब्रिटिश काळाचा तत्कालीन स्त्री जीवनावरील सामाजिक, सांस्कृतिक प्रभाव | १२६ |
| ३१ | डॉ. देवेंद्र विसपुते | ब्रिटिशांचे भारतातील दुरगामी संरक्षण धोरण | १३३ |
| ३२ | प्रा. राजविरेंद्रसिंग गावित | खान्देशातील ब्रिटिश राजवटीचा आदिवासींच्या जीवनावर पडलेला प्रभाव : एक आर्थिक दृष्टिक्षेप | १३७ |


Scanned by CamScanner

Journal of Research & Development
Vol.07 (Special Issue) November 2017,(ISSN-2230-9578)
UGC Journal List No.64768,COSMOS IMPACT FACTOR-4.270

# हैद्राबाद संस्थान : निजाम आणि ब्रिटिशांचे संबंध

*प्रा. डा. प्रशांत सुधाकर देशमुख*
*इतिहासविभाग प्रमख व मागदर्शक*
*अप्पासाहेब र. भा. गरुड महाविद्यावियल शेंदूर्णी,*
*ता. जामनेर, जि. जळगांव ४२४२०४*
*psdeshmukh२१०१@gmail.com*

## I प्रस्तावना :-

इ. स. १७२४ ला दक्षिणेत स्वतंत्र्य राज्याची स्थापना निजाम उलमुल्कने केली. निजाम पहिल्याचा मृत्यु इ. स. १७४८ ला झाला. त्याच्या मृत्यूनंतर सलाबतजंग गाझीउद्दीन यांच्यात वारसा संघर्ष झाला मीर निजाम अलीने यात विजय मिळविला व १७६२ - १८०३ पर्यंत राज्य केले.

निजाम III - सिकंदरशहा - १८०३ - १८२९,
निजाम IV - नासिरुदौला - १८२९ - १८५७,
निजाम V - अफजलुद्दौला - १८५७ - १८६९,
निजाम VI - मीर महबूबअली १८६९ - १९११,
निजाम VII - मीर महबूब अली १९११

सत्तेवर राहिले. साखरखर्ड्याच्या विजयाने ०३ सप्टेंबर १७२४ ला स्थापना झालेले हैद्राबाद संस्थान १७ सप्टे. १९४८ पर्यंत अस्तित्वात होते. २२४ वर्षे आणि १५ दिवस आसिफया राजवट दक्षिणेत होती. आसफियात दहा शासक झाले निजाम सहावा वीर महबूब अलीला वयाच्या तिसऱ्या वर्षी गादीवर बसून ब्रिटिश रिजेंटनी राज्यकारभार केला. इ.स. १८८४ ला वयाच्या १८ व्या वर्षी राज्यकारभार महबूब आलीस सज्ञान झाल्यास हाती देण्यात आला. महबूब आलीचा मृत्यु १९११ ला झाला तर नंतर निजाम सातवा मीर उस्मान अली खान सत्तेवर आले.

## II मीर उस्मानअली खान :-

निजाम सातवा म्हणून आणि निजामाच्या गादीवर दहावा वारस म्हणून २९ ऑगस्ट १९११ ला उस्मान अलीने सत्ता हाती घेतली. मीर उस्मान अलीचा जन्म अमतुज जेहरा बेगमच्या पोटी ०६ एप्रिल १८८६ ला झाल. वयाच्या २५ व्या वर्षी उस्मानअलीने सत्ता स्वीकारली. ब्रिटिशांनी अन्य संस्थानिकांप्रमाणे निजामाला 'हिज हायनेस' ह्या उपाधी बरोबरच 'हिज एक्झॉल्टेड हायनेस (एच.ई.एच) ही उपाधिही दिली होती. तसेच निजाम ब्रिटिशांचा 'फेथफूल अलाय ही होता'.

प्रथम जागतिक महायुध्दात ब्रिटिशांच्या सैन्याच्या बाजूने निजामाच्या फौजा तुर्कस्तानच्या विरोधात लढत असताना निजामाने ब्रिटिशांच्या विजयासाठी प्रयत्न केले. म्हणूनच इंग्लंडचा राजा जॉर्ज-पाचव्याने निजामाला 'एच.इ.एच'. व २४ जाने. १९१८ ला पत्राद्वारे फेथफुल आलाय ऑफ ब्रिटिश गव्हर्नमेंट असे संबोधले इस्माल धार्मातील जिल्लुल्लह, 'जिल्ले सुबहानी' या रितीरिवाजाप्रमाणे निजाम मीर उस्मान अलीला संबोधण्यात येत असे. निजाम सातव्याला राज्यकारभारात अवधी आणि निवांतपणा ही लाभला होता. [३]

निजाम उस्मानअलीच्या जनानखान्यात ४२ बेगमा, ५० मुले, ४६ नातवंडे, १६ सुना, ४४ दासीपुत्र होते. निजामाचा राज्यकारभार जुलै १९१२ ते नोव्हेंबर १९१४ पर्यंत दिवाण सालारजंग तृतीय यांनी केला. सालारजन तृतीयकडून दिवाणपद काढून घेवून निजाम उस्मान अलीने राज्यकारभार स्वतःकडे केंद्रीत केला. [४]

मीर उस्मानअली मूळतः महत्त्वाकांक्षी होता. पहिल्या निजामाप्रमाणे महत्त्वाकांक्षी आणि शत्रूच्या बाबत सावधगिरी बाळगण्याचा वारसा निजाम मीर अस्मानअलीने ही स्वीकारला होता. मराठा अथवा कर्नाटकातील पठाणांशी लढताना फ्रेंच व ब्रिटिशांशी सख्य पहिल्या निजामाने ठेवले होते. त्याचप्रमाणेच मीर उस्मानअलीने भारतीय स्वतंत्र्य चळवळ पाहता इ.स. १९१४ पासून भारतीय राजसत्तेतील शैथिल्य व विस्कळीतपणा येईल त्याचा लाभ घ्यावा व राज्य सुरक्षीत ठेवावे असा प्रयत्न केला. हैद्राबादचे स्वतंत्र रुपांतर ही उस्मानअलीची प्रबळ व चिवट महत्त्वाकांक्षा होती. [५] यासाठी निजामाने स्वतंत्र पध्दतीने राज्यकारभार करण्यासाठी व्हाईसरॉयशी



Scanned by CamScanner

पत्रव्यवहारही केला. स्वतंत्र राष्ट्र बनविण्याच्या हेतूनेच निजामाने 'चेंबर ऑफ प्रिन्सचे' सभासदत्वही स्वीकारले नाही. [६] स्वतंत्र राष्ट्र घोषीत करण्याची पूर्वतयारी म्हणून स्वतंत्र नाणे-चलन, बँक (Hyderbad State Bank) , स्वःअर्थव्यवस्था, विद्यापीठ, कॉलेजस, हैद्राबाद मुलकी सेवा(HCS) निजाम स्टेट रेल्वे (NSR), पोस्ट, तारायंत्रे, इत्यादी विभागाची राष्ट्रात हैद्राबाद मुत्सद्दीगिरीत कमी पडू नये म्हणून केंब्रिज इंग्रजी बोलणाऱ्यांची पिढी तयार व्हावी याची दक्षता १९२० च्या दशकात निजामाने घेतली. तसेच स्वतः ला पाठिंबा देणाऱ्या 'इत्तेहादूल मुसलमीन' संघेटनेची स्थापना करुन घेतली. [७] मुस्लीम लीगच्या विचाराला व ध्येय-धोरणांना बांधिल राहून स्वतंत्र हैद्राबाद राष्ट्र संकल्पना साकारता येणार नाही हैद्राबाद हे स्वतंत्र राष्ट्र व्हावे असे संस्थानातील १६ लक्ष मुसलमानांनाआशावादी स्वप्न 'इत्तेहादूल मुसलमीनची' दीड लक्ष रझाकार फोज उभारुन निजामाने दिले. [८] निजामाने इस्लामी राष्ट्राच्या पाठिंबा राहावा म्हणून इराणची राजकुमारी दुर्रेशहरवरचा विवाह स्वतःच्या मुलाशी लावला. तुर्कस्थान व सौदी अरेबियाच्या राजकुमारी आपल्या स्नुषा होतील यासाठीही निजामाने प्रयत्न केले होते. निजाम पहिल्याप्रमाणे निजाम सातवा महत्त्वाकांक्षी होता पण पहिल्या निजामाप्रमाणे गुण आणि शौर्याचा अभाव मीर उस्मान अलीकडे होता. 'हैद्राबादला स्वतंत्र राष्ट्र बणविण्यासाठी निजामाने केलेले प्रयत्न व परराष्ट्रात गुंतवलेलक ५० कोटी रुपये पाहता निजामाकडे कद्रु, लहरी आणि अफुबाज संस्थानिक म्हणून पाहणे म्हणून योग्य नाही' असे कै. नरहर कुरुंदकर म्हणतात ते संयुक्तिकच होय.

**III हैद्राबाद निजाम आणि ब्रिटिश : संबंध.**

इ.स. १७९९ मध्ये निजामअलीला म्हैसूरच्या युध्दात इंग्रजांनी मदत केली. लॉर्ड बेलस्नीने तैनाजी फौज सुरु केली. निजाम अीने तैनाजी फौजेचा स्वीकार केला. [९] १२ ऑक्टों. १८०० ला निजाम व ईस्ट इंडिया कंपनीच्या तहाने ब्रिटिश फौज सिकंदराबादला तैनात करण्यात आली व १७२४ ला स्थापन हैद्राबादचे स्वातंत्र्य नष्ट झाले. [१०]

निजामअलीचा मृत्यु १८०३ इ.स.ला झाला. त्याचा मुलगा सिकंदरशहा हा १८०३ ला गादीवर आला. तिसरे मराठा - इंग्रज युध्द सुरु झाले २३ सप्टेंबर १८०३ ला आसईच्या युध्दात आर्थर वेलस्लीने शिंदे-भोसलेंचा पराभव केला. दवगांव तह २५ डिसें. १८०३ आणि सुर्जी अंजनगावच्या तहाने ३० डिसेंबर १८०३ ला भोसल्यांचा वऱ्हाडवरील हक्क-अधिकार समाप्त झाले वऱ्हाड निजामाला मिळाला तर शिंदेच्या ताब्यातील भोकरदन, जालना व गंगापूरचा भाग सुध्दा निजामाला मिळाला.

रेसिडेंन्टच्या आश्रयाखाली स्थापना झालेल्या पामर कंपनीच्या कर्जफेडीबाबत हैद्राबाद सरकारला उत्तर सरकारवरील खंडणीचा हक्क कायमचा सोडून घावा लागला. (इ.स.१८२४) आणि तैनाजी फौजेच्या खर्चासाठी वऱ्हाड, उस्मानाबाद व रायचूर हे प्रांत इंग्रजांकडे १८५३ ला गहाण ठेवावे लागेले. [११]

यातील रायचूर आणि उस्मानाबाद जिल्हा १८५७ च्या उठावात हैद्राबाद राज्याने ब्रिटिशनिष्ठा राखली म्हणून निजामाला परत करण्यात आले. [१२]

दि. १२ ऑक्टोंबर १८०० ला निजाम अलीने लॉर्ड वेलस्लीच्या तैनाजी फौजेचा स्वीकार केला. हैद्राबाद संस्थानाच्या अंतर्गत आणि बाह्य संरक्षणाची जबाबदारी ईस्ट इंडीया कंपनीने घेतली. सिकंदराबादला फौज कायम करण्यात आली. इ.स. १७९९ च्या निजाम - म्हैसूर युध्दाने निजामाला प्रदेश मिळाला परंतु तैनाजी फौजेने निजाम हैद्राबाद संस्थनाची स्वतंत्रता गमावून बसला. हैदाबादचे स्वातंत्र्य नष्ट झाले. निजाम अलीच्या तैनाजी फौज स्वीकारण्याच्या धोरणाला विरोध म्हणून दिवाणी मीर आलम आणि वऱ्हाड प्रांताचा सरदार महिपतराव यांनी पेशवा-होळकर आणि शिंदेच्या मदतीने गुलबर्गा भागात बंड केले व १२ फेब्रु. १८०२ ला निजामाच्या सैन्याचा पराभव केला. तैनाजी फौजेने पाठविलेले अधिकारी आणि सैन्यही मारले गेले. निजाम सिकंदराबादला बाळगत असलेली तैनाती फौज दुर्बल होती याचे हे प्रमाण होते. [१३]

दिवाण मीर आलमच्या जागील इ.स. १८०२ ला दिवाण म्हणून राजा चंदुलाल यांची नियुक्ती निजाम सिकंदर शहाने केली. जमीन महसुलीच्या वसुलीसाठी चंदुलाल यांनी लिलाव पध्दत स्वीकारली. देशमुख, देशपांडे यांना शेतसारा वसुलीची कामे दिली. [१४] दिवाण चंदुलालने कर्ज काढली. कर्ज फेडीसाठी तालुका-गावे यांचे लिलाव केले. चंदुलाल 'दिवाण' म्हणून १८०८-४३ पर्यंत कार्यरत होते. दिवाण चंदुलाल हा गैरकारभारसाठी प्रसिध्द राहिला. [१५] तिसऱ्या आणि चौथ्या निजामाच्या काळात चंदुलालने दिवाण म्हणून कार्य केले. निजाम



Scanned by CamScanner

राजवटीत गैरकारभारामुळे 'मोगलाई' हा शब्द प्रयोग हैद्राबाद राज्यात दिवाण राजा चंदुलाल यांच्याव कारकीर्दी पासुन रुढ झाला. [१६]

तैनाजी फौजेचा खर्च आणि राजा चंदुलाल यांची कारकीर्द निजाम राजव्यवस्था दुर्बल करणारी होती. विल्यम पामर ह्या ब्रिटीशाने हैद्राबद संसीडेंट रुसेलच्या पाठिंब्याने पेढी व्यवसाय केला. इ.स. १८१६ ला पामर कंपनीला ईस्ट इंडिया कंपनीने अधिकृत परवाना दिला. निजाम सिकंदरशहाने पामर कंपनीकडून ब्रिटिश सैन्याचा पगार वेळेवर देण्यासाठी महिना २ लाख रुपयाचे कर्ज घेतले. २५% दराने निजामाने घेतलेल्या कर्जाच्या फेडीसाठी पामर कंपनीला वऱ्हाडमधील जिल्हे दिले. पामर कुटुंबाचा वैयक्तिक खर्चही निजामाने दिला. [१७] चार्लस् मेटकॉफ १८२० ला हैद्राबादचा रेसीडेंट झाला. पामर पेढीच्या गैरव्यवहाराची मेटकॉफने चौकशी केली व गेरव्यवहारी पामर कंपनीच्या ८२.५ लाख रुपयाच्या कर्जाची जबाबदारी ईस्ट इंडिया कंपनीने स्वतः घेतली व निजामाकडून मच्छलीपट्टनमचे जिल्हे ह्या कर्जफेडीबद्दल घेतले व निजामाचे हैद्राबाद राज्य सुरक्षित ठेवले. इ.स. १८०० पासुन हैद्राबाद संस्थान इ.स. १८५८ पर्यंत कंपनीच्या परवानगीशिवाय आणि इ.स. १८५८ नंतर व्हाईसरॉयच्या मान्यतेशिवाय निर्णय घेण्यास स्वतंत्र नव्हते. दिवाण अर्थात पंतप्रधानाची नियुक्ती रेसीडेंन्टच्या परवानगीशिवाय निजामाला करण्याचा अधिकार नव्हता. [१८] ब्रिटीशांचा अधिन म्हणून निजाम कारभार करीत असे. व्हॉईसरॉयच्या परवानगीशिवाय कार्य करता येणार नसले तरी आपण स्वतंत्र हैद्राबाद राज्याचे अधिपती आहोत असा मीर उस्मान अलीचा विचार होता. [१९]

**IV पंतप्रधान सालारजंग यांच्या सुधारणा :-**

पंतप्रधान चंदुलालच्या गैर राज्यकारभार नंतर हैद्राबाद संस्थानचा राज्यकारभार पंतप्रधान सालारजंग यांनी सुधारणात्मक दृष्टीकोनातून चालविला व हैद्राबाद संस्थानात सुधारणा घडवून मध्ययुगीन हैद्राबाद संस्थानाला आधुनिक युगात प्रविष्ट करण्याचा प्रयत्न केला. इ.स.१८५७ ला भारतात ब्रिटिश साम्राज्यविरुध्द उठाव झाला. हैद्राबाद संस्थानात जून १८५७ ला औरंगाबादच्या छावणीतील फौजेने उठाव केला. कॅ. अॅबटच्या विरुध्द मीर फिदाअलीने उठावाचे नेतृत्व केले. जुलै १८५७ ला हैद्राबादंत रोहिलांनी उठाव केला. इ.स. १८५७ च्या उठावानंतर भारतात राणी व्हिक्टोरियाने 'जाहिरनामा' घोषीत केला व भारतीयांना सुधारणा व अधिकार दिले. इ.स. १८५७ च्या उठावात हैद्राबाद संस्थानात औरंगाबाद - हैद्राबादेतील उठाव दडपून टाकण्यात निजामाने साह्य केल्याने निजामाकडे तैनाजी फौजेच्या खर्चासाठी झालेले ५० लाखाने कर्ज माफ केले. [२३]

इ.स. १८५३-८३ या तीन दशकांच्या काळात हैद्राबादची धुरा समर्थपणे आपल्या खांद्यावर घेतलेल्या दिवाण सालारजंग पहिलाने ब्रिटिशांच्या सल्ल्याने हैद्राबाद प्रशासन व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला. महसुल प्रशासन व्यवस्थेत दिवाण मीर आलमने सुरु केलेली लिलाव व्यवस्था बंद केली. महसुल व्यवस्थेत आमूलाग्र बदल केले. परंतु मोगलाई दरबारासच्या परंपरा कायम ठेवून नवीनल प्रशासन व्यवस्था अस्तित्वात आणली व पाश्चत्य शिक्षण घेतलेले नवे अधिकारी नेमलें. हैद्राबाद संस्थानात उत्तर भारतातून हे अधिकारी सेवेत घेतले. इ.स. १८५८ ला संस्थानात लागू प्रशासकीय पुनर्रव्यवस्थेचा प्रयोग हैद्राबाद संस्थानाच्या विसर्जनापर्यंत राहिला. [२४]

पंतप्रधान सालारंजंगांनी महसुल प्रशासनातील भ्रष्ट अधिकारी कमी केले, शेतसारा वसुलीची लिलाव पध्दत बंद केली, महसुल व्यवस्थेच्या कामातून देशमुख - देशापांडेंना कमी केले, हैद्राबाद संस्थानाचे पाच प्रशासकीय विभाग करुन १७ जिल्ह्यात विभागणी केली. [२५] निजाम सहावा अफजलउद्दौलाचा फेब्रुवारी १८६९ ला मृत्यू झ ााला. अफजलउद्दौलाचा मुलगा तीन वर्षाच्या असल्याने पालकत्वाची जबाबदारी ब्रिटिशांनी सालारंजग-पहिला आणि अमीर-ए-कबीर यांना दिली. इ.स. १८५८ ला सालारजंगानी केलेल्या सुधारणांची अमलबजावणी संस्थानात करण्यास स्वातंत्र्य आणि संधी मिळाली. [२६] अल्पवयस्क मीर महूबअलीखानास १८८४ ला राज्यकारभार हातात देण्यात आला. यावेळी इ.स. १८८४ ला लॉर्ड रिपन व्हाईसराय होता. मीर महबूबअलीने राज्यकारभार हाती घेंतला. सालारजंग-पहिल्याचा १८८३ ला मृत्यू झाला. हैद्राबाद संस्थानात सुधारणा करुन सालारजंगने संस्थान दृढ आणि प्रागतिक बनविण्याचा प्रयत्न केला.

सालारजंगानी हैद्राबाद संस्थानात उत्तर प्रदश, बेंगाल, मुंबई, मद्रास इलाख्यातील कर्तृत्ववान व्यक्तिंना सेवेत संधी दिल्या. सय्यद हुसेन बिलग्रामी, डॉ. सय्यद अली बिलग्रामी, मुस्ताक हुसेन, सय्यद मेहंदी अली, अब्दुल कयाम, डॉ. आघोरनाथ



Scanned by CamScanner

चट्टोपाध्याय, इत्यादींनी तर हैद्राबाद आणि रेसिडन्सीत न्यायालयात नामांकित वकिलांनी कार्य केले. यात रामचंद्र पिल्ले सारख्यांचा समावेष होता. तीन निजाम (नासीरउद्दौला, अफजलउद्दौला व मीरमहबूब अली) यांच्या काळात सालारजंगांनी कार्य केले. १८५३-८३ हा हैद्राबाद संस्थानाचा रचनात्मक कार्यकाळ होता. [२७] संस्थानावर असणारे १.७० कोटींचे कर्ज त्यांनी मुक्त केले व संस्थानास आर्थिक समृध्दता मिळवून दिली. कट्टर साम्राज्यवादी व्हाईसरॉय लॉर्ड लिटनने रेसिडेंट सर रिचर्ड लिहिलेल्या पत्रात सालारजंगाविषयी नमूद केले की, 'भारतात ब्रिटिश साम्राज्य सत्तेला दुष्काळ आणि युध्द काळात सामोरे जाण्यापेक्षा अवघड कार्य हैद्राबादेंत आहे'. [२८] सालारजंगानी दळण-वळणाच्या विकासावर भर दिली. हैद्राबाद-सोलापूर रस्ता १८६० ला, मुंबई-मद्रास मार्गावर गुलबर्गा व कुर्डूवाडी रेल्वेस्टेशन १८६८ ला तर हैद्राबाद ब्रॉडगेज मार्गाने १८७८ ला जोडले. विदर्भाचा प्रश्न ब्रिटिशांशी सालारलंगानी राजनितीक बळावर आपल्या कारकिर्दीत समारे येवू दिला नाही. [२९] म्हणूनच ब्रिटिशांनी सालारजंगाकडे असणाऱ्या कार्यक्षमता, गुणवत्ता आणि श्रेष्टत्व जाणून हैद्राबाद संस्थानाविषयी अलग धोरणांचा स्वीकार केला. रोहिले-पठाण यांच्याकडे असणारे गहाण तालुके कर्जमुक्त केले, जहागिरदार-इनामदारांच्या सनदांची तपासणी केली, प्रमुख ठिकाणी शाळांची उभारणी केली, हैद्राबाद हे मुंबई-मद्रास रेल्वेमार्गाशी जोडण्यात आले, स्वतंत्र पोष्ट व्यवस्था इ.स. १८६९ ला उभारणी, 'हैद्राबाद स्टेट बँक' काढण्यात आली, न्यायव्यवस्था-सार्वजनिक बांधकाम विभाग, आरोग्य, पोलिस व शिाण यांत सुधारणा केल्या. हैद्राबाद स्वतंत्र चलन, स्वतंत्र पोस्ट, स्वतंत्र दळण - वळण, स्वतंत्र बँक, स्वतंत्र आर्थिक ताळेबंद (बजेट) ची निर्मिती करण्याचा प्रयत्न सालारजंगाने केला. एक स्वतंत्र राष्ट्रासाठी आवश्यक असणारे हे घटक हैद्राबाद संस्थानाकडे सालारजंगाच्या सुधारणांमुळे होते. मीर उस्मान अलीने राष्ट्रभाषा उर्दू, स्वतंत्र विद्यापीठ, हैद्राबाद राज्याची महाविद्यालये, हैदाबाद मुलकी सेवा (HCS), स्वतंत्र लष्कर, औद्योगिकीरण व परराष्ट्रात आर्थिक गुंतवणूक केली. हैद्रबाद स्वतंत्र राष्ट्र बनविण्यासाठी हे घटक उपयुक्त होते. [३०]

पंतप्रधान सालारजंगाच्या सुधारणांमुळे हैद्राबाद संस्थानात प्रशासकीय सेवेत संस्थानाबाहेरुन विशेषतः उत्तर भारतातून नौकरदार आले. पाश्चात्य शिक्षण घेतलेला हिंदु-मुस्लीम वर्ग संस्थानात आला. १९ व्या शतकाच्या अखेरीला या वर्गाचे प्राबल्य प्रशासनात राहिले हैद्राबाद संस्थानाच्या प्रगतीत या वर्गाचे व सालारजंगाच्या सुधारणांचे महत्व होते. हैद्राबादच्या वाटचालीत या वर्गाचा वाटा महत्वपुर्ण होता परंतु हा वर्ग गैरमुलकी होता. यातूनच मुलकी - गैरमुलकी संघर्षाची सुरुवात झाली. [३१] निजाम-ब्रिटिश यांच्यातील राजकीय संबंध तैनाती फौज हैद्राबादेंत ठेवल्यापासून वाढले. इ.स. १८३५,१८६७ व १८९७ ला ब्रिटिश सरकारने निजामाला प्रशासन आणि आर्थिक सुधारणा करण्याबाबत सांगितले. [३२] म्हणून १९२० ला निजामाने 'इक्झिक्युटिव्ह कैन्सिलची' स्थापना केली.

इ.स. १९११ ला संस्थानात न्याय, लष्कर, व्यापार, राजकीय व्यवस्ज्ञथा, अर्थ, अमूर-इ-आमा आणि मालगुजारी अशी सात खाते असणारे 'बाबेहुकुमत' व 'मजलीस वाजे कवानिन' हे दुसरे मंडळ राज्य व्यवस्थेसाठी अस्तित्वात होती. [३३] इ.स. १९२० ला राज्यव्यवस्था 'कौन्सिल' कडे देण्यात आली. इ.स. १९१४ ला सालारजंग तृतीयला पंतप्रधान पदावरुन काढून निजामाने सर्व सत्ता स्वतःच्या हातात घेतली. निजामाने पंतप्रधान पदही स्वतःकडे ठेवले होते. १९१९ ला बाबेहुकमत - (कॅबिनेट कौन्सिल) रद्द करण्यात आले व एक्झिक्युटिव्ह कौन्सिल स्थापना झ ाले व अध्यक्ष सर अली इमाम यांना नेमलें. ११ खात्याची व्यवस्था कौन्सिलकडे होती.

इ.स. १९११ ला व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिगने निजाम - ब्रिटिश यांच्यातील करारापूर्वी एक्झिक्युटिव्ह कौन्सिल स्थापण्यास सांगितले. इ.स. १९१४ ला जागतिक महायुध्द प्रारंभ झाले. निजामाचे सैन्य ब्रिटिशांच्या बाजूने तुर्कस्तान विरुध्द लढले. यावेळी संपूर्ण भारतात तुर्कस्तानच्या रक्षणासाठी 'खिलापत चळवळ' झाली मात्र हैद्राबाद संस्थान ब्रिटिशांच्या बाजूने राहिले.

प्रथम जागतिक महायुध्दानंतर व्हाईसरॉय लॉर्ड चेम्सफर्डने निजामाला प्रशासकीय सुधारणा करण्याचा सल्ला दिला अन्यथा ब्रिटिश सत्ता संस्थानात हस्तक्षेप करण्याचा इशारा दिला. [३४]

**संदर्भ व टीपा :-**

१. *निजाम दहा शासक-मीर कमरुद्दीन (१७२४-४८), मुजफ्फरजंग (१७४९-५०), नासिरजंग (१७५०-५११), सलाबतजंग (१७५१-६२), निजामअली (१७६३- १८०३), सिकंदरजहाँ*



Scanned by CamScanner

(१८०३-१८२९), असफजलउद्दौला (१८६८-१९११), मीर उस्मान अली (१९११-१९४८).

२. भालेराव, अनंत, हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम व मराठवाडा, मौजे प्रकाशन, मुंबई, द्वि.आ.२००१, पृ. २०.

३. कित्ता, पृ. १५-१६.

४. शर्मा, राघवेंद्र भीमराव, हैद्राबाद व देशी संस्थाने, भाग-०१, अर्यभुषण मुद्रणालय, पुणे, १९२८, पृ.०८.

५. कुरुंदकर, कै.नरहर, प्रा.द.पं.जोशी(संपा)., हैद्राबाद विमोचन व विसर्जन, रजत प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ. सप्टेंबर १९९८, पृ.९८-९९

६. कित्ता, पृ. १००.

७. कित्ता, पृ. १०१.

८. कित्ता, पृ. १०२.

९. पगडी, सेतू माधवराव, हैद्राबादेतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास, म.सा.प., काळ नमूद नाही, औरंगाबाद, पृ. ०२.

१०. कित्ता, पृ. ०४.

११. कित्ता, पृ. ०७.

१२. दाते,एस.आर., भागानगर स्ट्रगल, वि.जी.केतकर, सदाशिव पेठ,पुणे-०२, काळ नमूद नाही, पृ.११-१२.

१३. देशमुख, लक्ष्मीकांत, वि.ल.धारुरकर(संपा.), मक्ति संग्राम, म.सा.प.औरंगाबाद, १९९८, पृ.१९-२०

१४. कित्ता, पृ. २०.

१५. कित्ता, पृ. २०.

१६. कित्ता, पृ.२१.

१७. कित्ता, पृ. २१.

१८. पोतदार, वसंत ब., हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, प्रका. वसंत ब. पोतदार, आष्टा, जि. उस्मानाबाद, द्वि.आ.,१९८४, प.२६.

१९. कित्ता, पृ. २६.

२०. पगडी, सेतू माधवराव, हैद्राबादेतील स्वातंत्र्याच्या चळवळीचा इतिहास, मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, (काळ नमूद नाही) पृ.४१.

२१. कित्ता, पृ.

२२. दाते, एस.आर, भागानगर स्ट्रगल, प्रका. वि.जी.केतकर, सदाशिव पेठ, पुणे-०२, काळ नमूद नाही, पृ.१३.

२३. देशमुख, लक्ष्मीकांत, वि.ल.धारुरकर(संपा.), मुक्ति संग्राम, म.सा.प.औरंगाबाद १९९८, पृ.१९-२४.

२४. मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, १७ सप्टेंबर१९९८, पृ.१११.

२५. काटे, पी.व्ही., मराठवाडा अन्डर दि निजाम, मित्तल पब्लिकेशन, दिल्ली-३५, प्र.आ., १९८७, पृ.१९.

२६. कित्ता, पृ. १९.

२७. दि फ्रिडम स्ट्रगल इन हैद्राबाद, भाग-०२, हैद्राबाद स्टेट कमिटी, १९५९, पृ. २५६.

२८. कित्ता, पृ. २५७.

२९. कित्ता, पृ. २५६.

३०. कुरुंदकर, कै.नरहर, प्रा.द.पं.जोशी(संपा.), हैद्रबाद विमोचन व विसर्जन, रजत प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ. सप्टेंबर १९९८, पृ.११०.

३१. मराठवाडा स्वातंत्र्य सुवर्ण महोत्सव विशेषांक, १७ सप्टेंबर १९९८, पृ.१११.

३२. कुलकर्णी, बी.बी., डॉ. रणवीर शंग्रा, (अनु.), आधुनिक भारत के निर्माता - के.एम.मुन्सी., प्रकाशन विभाग, सूचना - प्रसारण मंत्रलय, भारत सरकार, मे १९८७, पृ.१२८.

३३. पोतदार वसंत ब., हैद्राबाद स्वातंत्र्य संग्राम, प्रका. वसंत ब. पोतदार, आष्टा, जि. उस्मानाबाद, द्वि.आ.१९८४, पृ.२२.

३४. कुलकर्णी, बी.बी., डॉ. रणवीर शंग्रा(अनु.), पुर्वोक्त, पृ.१२८.



Scanned by CamScanner